पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष १ ले • अंक : १० • जून २००८ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## क्रिडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण

कामगार कल्याण निधीतर्फे दिनांक २६ ते ३० डिसेंबर, २००७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विविध क्रिडा स्पर्धांमधील विजेत्यांसाठी दिनांक २७/५/२००८ रोजी पारितोषिक वितरण समारंभ कै. वडके सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा. प्रमोद भानगिरे, सभासद, पुणे मनपा आणि मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), या क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यामध्ये विशेष परिश्रम घेतलेले मा.सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम व्यासपीठावर उपस्थित होते. क्रिकेट स्पर्धेमध्ये अग्निशामक-पाणी पुरवठा विभाग विजेता तर उप आयुक्त क्र.२ विभाग उपविजेता ठरला. व्हॉलीबॉल क्रिडा प्रकारात अग्निशामक दल विजेते तर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय उपविजेते ठरले. दोन्ही क्रिडा प्रकारातील विजेत्यांना फिरते चषक देण्यात आले. याशिवाय खालील क्रिडा प्रकारामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकांना सुवर्ण, रजत व कास्य पदके मान्यवरांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले.



टेबल टेनिस (एकेरी) - श्री. जगताप नंदकुमार-प्रथम, श्री. भाडळे रविंद्र-द्वितीय, टेबल टेनिस (दुहेरी) - श्री. जगताप नंदकुमारे-श्री.शेवाळे सुभाष-प्रथम, श्री. भाडळे रविंद्र-श्री. राजपाठक श्रीरंग -द्वितीय, १०० मीटर धावणे-(१८ ते ३० वयोगट) श्री. राहूल माळी-प्रथम, श्री. सचिन शेलार-द्वितीय, श्री. विशाल बोरकर-तृतीय, १०० मीटर धावणे - (३१ ते ४५ वयोगट) श्री.पिंजण विजय -प्रथम, श्री. टोले अनंत-द्वितीय, श्री. मांजरे गणेश-तृतीय, १०० मीटर धावणे - (४६ ते ६० वयोगट) - श्री. पंढरी अविनाश-प्रथम, श्री. पत्तीवार राजेंद्र-द्वितीय, श्री.जगताप नंदकुमार-तृतीय, ५० मीटर पोहणे (४० वर्षावरील) - श्री. राजाराम केदारी-प्रथम, श्री. आनंद तारु-द्वितीय, ५० मीटर पोहणे (खुलागट) - श्री. विशाल बोरकर-प्रथम, श्री. दिलीप ढगळे-द्वितीय, लांब उडी (१८ ते ३०) - श्री. संदिप पाटोळे-प्रथम, श्री. सचिन शेलार-द्वितीय, श्री. विशाल बोरकर-तृतीय, लांब उडी (३१ ते ४५) - श्री.लक्ष्मीकांत शिंदे-प्रथम, श्री. निलेश चव्हाण-द्वितीय, श्री.गणेश मांजरे-तृतीय, लांब उडी (४६ ते ६०) - श्री.अविनाश पंढरी-प्रथम, श्री. राजेंद्र पत्तीवार-द्वितीय, कुस्ती (६० किलो) - श्री. दिलीप कवितके-प्रथम, कुस्ती (६६ किलो)-श्री. विजय जावळकर-प्रथम, कुस्ती ( ७४ किलो)-श्री. भगवान बोराटे-प्रथम, कुस्ती (८५ किलो)-श्री. हनुमंत नांगरे-प्रथम, कुस्ती (९६ किलो)-श्री. नामदेव भोसले-प्रथम, कुस्ती (१२० किलो)-श्री. शुक्राचार्य वांजळे-प्रथम, थ्रो बॉल (महिलांसाठी) - श्रीमती अमृता गवते-प्रथम, श्रीमती अरुणा जाधव-द्वितीय, संगीत खुर्ची (महिलांसाठी) - श्रीमती शैला चव्हाण-प्रथम, श्रीमती भाग्यश्री जोशी-द्वितीय, कॅरम-श्री. बाळू गायकवाड-प्रथम, श्री.राजेश भिकुले-द्वितीय, बुध्दिबळ-श्री. पंकज बेंद्रे-प्रथम, श्री. अरविंद चव्हाण-द्वितीय

मा. नाना भानगिरे यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये खेळातील सहभागामुळे कर्मचाऱ्यांमध्ये परस्पर समन्वयाची भावना आणि एकाग्रता वाढीस लागते. परिणामी त्यांची दैनंदिन कामकाजातील कार्यक्षमता वाढीस लागून एकूणच संस्थेची प्रगती व विकास होण्यास मदत होते. त्यामुळे कामगार कल्याण निधीमार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे मा. भानगिरे यांनी कौतुक करुन वेळोवेळी लागणाऱ्या सहाय्यासाठी सदैव तयार असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शिवाजी दौंडकर यांनी केले. सदरच्या स्पर्धा आयोजित करण्यामध्ये मा. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम व विविध क्रिडा प्रकारांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या समन्वयकांनी विशेष परिश्रम घेतले. त्या सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

## संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानामध्ये महापालिकेस द्वितीय क्रमांक

महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत आयोजित संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानामध्ये सन २००५-०६ मध्ये केलेल्या विविध विकास कामांच्या मूल्यांकनानुसार द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पुणे मनपाने मिळविले. रक्कम रु. १५ लाख (धनादेश),स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे हे पारितोषिक आहे. सदर पारितोषिक मा. श्री. जयपाल रेड्डी, नगर विकास मंत्री, भारत सरकार यांचे हस्ते देण्यात आले. मा. सौ.राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे, मा. प्रविणसिंह परदेशी, आयुक्त, पुणे व मा. अश्विनीताई कदम अध्यक्ष, महिला बालकल्याण समिती यांनी सदर पारितोषिक स्विकारले. सदर कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमास मा. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, मा. आर.आर.पाटील, उप मुख्यमंत्री आणि मा. अजित पवार, जलसंपदा मंत्री यांनी समयोचित मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये मा. श्री. जयपाल रेड्डी यांनी महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतेच्या कामी नागरिकांच्या सहभागाने शहराची स्वच्छता राखण्याबरोबरच अन्य विकास कामे यशस्वी झाल्याचा अनुभव कथन केला. तसेच, महाराष्ट्रातील स्वच्छता अभियानाची प्रशंसा करीत त्यांनी केवळ याच कारणास्तव शहरांची विविध विकास कामे मोठ्या प्रमाणावर मार्गी लागावीत म्हणून केंद्र शासनाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांचा निपटारा जलद गतीने होण्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्विकास योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिल्याचे प्रतिपादन केले. या प्रसंगी मा. सभासद, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज), क्षेत्रीय व अन्य अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक स्वच्छता यंत्रणेत कार्यरत असणारे आरोग्यदूत तथा सफाई सेवक व अधिकारी यांच्या कार्यामुळे हा बहुमुल्य पुरस्कार मिळाल्याने त्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या कार्याला आदरपूर्वक अभिवादन.



## कामगार दिंडी आळंदी-पुणे



कामगार कल्याण विभागामार्फत आळंदी ते पुणे कामगार दिंडीचे दिनांक २७/६/२००८ रोजी दिंडी प्रमुख श्री. सखाराम पळसे व अशोक ढगे यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते. दिंडीमध्ये ३७ अधिकारी/सेवक सहभागी झाले होते. पुणे मनपा भवनापासून सकाळी ६.३० वाजता दिंडीचे प्रस्थान झाले. साईबाबा मंदीराजवळ सदर दिंडी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झाली.

या ठिकाणी श्री.नरसिंगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अल्पोपहार व चहापान व्यवस्था केली होती. दिंडीसमवेत प्रबोधन फलक हातात घेवून व कामगार कलापथकातील श्री.अरुण शेंडगे, श्री.भिमराव बनसोडे यांनी आपली कला सादर करुन सहभागी वारकऱ्यांमध्ये पर्यावरण, आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता, नागरी सुविधा, करभरणा याबद्दल जागृती निर्माण करुन प्रबोधनाचा यशस्वी उपक्रम राबविला. या अभिनव उपक्रमाची बहुसंख्य सहभागी वारकऱ्यांनी व वारकऱ्यांचे स्वागत करणाऱ्या मान्यवरांनी दखल घेवून उत्तम प्रतिसाद दिल्याचे अनुभवास आले. या कामगार दिंडीचे सर्वत्र उत्स्फूर्तपणे स्वागत करुन दिंडी प्रमुखांचा श्रीफळ व स्मृतीचिन्हे देवून सत्कारही करण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने मा. महापौर, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा समावेश आहे. या कामगार दिंडीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी/सेवकांसाठी राम सोसायटीत श्री.रमेश काथवटे, श्री.शिवाजी घारे, श्री.सिद्राम सिंदगी व श्री.अशोक ढगे यांनी घरगुती भोजनाची उत्तम व्यवस्था त्यांच्या मित्र व सर्व कुटुंबियांच्या सहकार्याने केली होती. त्यांच्या या सहकार्याबद्दल सर्वांनी त्यांना व कुटुंबियांना धन्यवाद दिले. त्यानंतर दिंडीमधील महिला सेविकांतर्फे त्यांच्या कुटुंबियांना श्रीफळ देवून सत्कार केला. त्यानंतर दिंडीचे पुढील मार्गक्रमण सुरु झाले.

सायंकाळी ४.३० वाजता दिंडी सोहळा मनपा भवन येथे पोचला. या ठिकाणी हिरवळीवर कलापथकातील कामगारांनी आपली कला सादर केली. त्यानंतर चहापान होवून दिंडी सोहळा विसर्जित झाला. दिंडी उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या श्री.रुकारी, श्री.दिलीपशेठ गांधी, श्री.नरसिंगे, श्री.काथवटे, श्री.घारे, श्री.सिंदगी, श्री. ढगे, श्री.बाळासाहेब जाधव आणि या सर्वांचे कुटुंबीय यांचे कामगार कल्याण निधीतर्फे विशेष आभार. कारण त्यांच्या उत्स्फूर्त व सक्रीय सहभागामुळेच हा दिंडी सोहळा उपक्रम यशस्वी झाला. दैनंदिन कामाबरोबर सामाजिक बांधिलकीच्या नात्याने करण्यात येणारे हे कार्य उत्तरोत्तर असेच वृध्दिंगत होत जावो व त्यामध्ये सर्वांचा स्नेह आहेच तो उत्तरोत्तर वृध्दिंगत व्हावा, हीच माउलींच्या चरणी प्रार्थना.

## अनुषंगिक लाभ (Fringe Benefits)

इंग्लंडमध्ये प्रथम चक्राला गती मिळाली आणि औद्योगिक उत्क्रांती सुरु झाली. उत्क्रांतीच्या प्राथमिक अवस्थेमध्ये भांडवलशाहीचा प्रभाव प्रचंड होता. त्यामुळे उद्योगपती आपला नफा वाढविण्याचा प्रयत्न करीत असत. या प्रयत्नामध्ये कामगारांची पिळवणूक हा नफा वाढविण्याचा प्रमुख राजमार्ग उपयोगात आणला होता. कर्मचाऱ्यांना त्यांच्या श्रमाचा पूर्ण मोबदला किंवा अनुषंगिक लाभ देण्यात येत नव्हते. अनुषंगिक लाभ तर सोडाच परंतु त्यांना देण्यात येणारे वेतनही अत्यंत तुटपुंजे होते.ही पिळवणूक करण्याची सर्वमान्य पध्दती होती.

परंतु स्थिती आणि गती कायम रहात नसल्याने, दोन्हीमध्ये बदल होत गेले. कर्मचाऱ्यांच्या हितरक्षणासाठी सरकारने विविध कामगार आणि औद्योगिक कायदे करुन अंमलबजावणी सुरु केली. अस्तित्वातीर्ले कामगार कायदे हे कामगारांना संरक्षण देणारे आहेत. यामध्ये कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३, वेतन प्रदान अधिनियम १९३६, किमान वेतन अधिनियम १९४८, असे मुलभूत हक्क देणाऱ्या कायद्याद्वारे कामगारांच्या श्रमाचा पूर्ण मोबदला त्यांच्या पदरात टाकण्यासाठी आवश्यक तरतुदी करण्यात आल्या. याबरोबर कामगार हा घटक प्रमाणभूत मानून भविष्य निर्वाह निधी, कामगार राज्य विमा, कल्याण निधी, प्रसूती रजा असे अनुषंगिक लाभ देणारे कायदे करुन, अंमलबजावणी सुरु झाली. त्यामुळे कामगारांना त्यांचे वेतन आणि अनुषंगिक लाभ देणे उद्योगपतींच्या लहरीवर, ऐच्छिक न रहाता बंधनकारक झाले. त्यामुळे कामगारांना योग्य वेतन व अन्य सोयी सुविधा उपलब्ध झाल्या. हा या कायद्यांचा सफल व दृश्य परिणाम होय. त्यामुळे प्रामुख्याने संघटित कामगारांना जास्त लाभ झाला. असंघटित कामगार लाभापासून वंचित असल्याचे अद्यापही दिसून येत आहे.

वरील पार्श्वभूमीवर संघटित क्षेत्रात व लौकिकप्राप्त सार्वजनिक व खाजगी उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या नियुक्ती आदेशामुळेच वेगळा सामाजिक दर्जा प्राप्त होतो. हा दर्जा प्रमुख अनुषंगिक लाभ आहे. आपण ज्या संस्थेत काम करतो त्यामुळे हा दर्जा प्राप्त झाला आहे, तसेच ही संस्था टिकल्यास आपला दर्जा व आपण सुस्थितीत रहाणार आहे याचे भान कामगारांनी ठेवावे. त्यामुळे संबंधित संस्थेस वैभव प्राप्त होण्यासाठी संस्थेवर निष्ठा ठेवून, सर्वोच्च श्रम व कौशल्य संस्थेसाठी देणे आवश्यक आहे. प्रत्येक कामगाराने निष्ठेने आपल्यातील सर्वोत्कृष्ट कौशल्य व श्रम संबंधित संस्थेस दिल्यास सध्या त्याला मिळणारे वेतन आणि अनुषंगिक लाभापेक्षा उच्च दर्जाचे वेतन आणि लाभ मिळणे शक्य होणार आहे. श्रमातूनच संपत्ती निर्माण होते, हे सत्य कोणीही नाकारत नाही. तथापि श्रमाला भांडवलाची साथ आवश्यक आहे. श्रम व भांडवल एकाच नाण्याच्या दोन बाजू असून एकमेकास पूरक आहेत, त्यामुळे या दोन्ही गोष्टींच्या समन्वयाने संस्थेबरोबर स्वत:चा उत्कर्ष साधणे शक्य होते.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने अनुषंगिक लाभाची व्याख्या वेतनाव्यतिरिक्त रोख स्वरुपात देण्यात येणारा लाभ अशी केली आहे. कामगारांना पूर्ण पगारी सुट्या, सवलतीत जेवण, प्रवास, भाड्याचे घर, औषधोपचार, इ. यामुळे वेतनात वाढ होते. याला अनुषंगिक लाभ म्हणतात. थोडक्यात नियमित वेतनाशिवाय मालकातर्फे दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या सवलती व सोयी यांचा अनुषंगिक लाभामध्ये अंतर्भाव होतो. त्यामुळे अनुषंगिक लाभ म्हणजे कर्मचाऱ्याच्या कामाच्या मुलभूत वेतना पलिकडील लाभ होय.

अनुषंगिक लाभ ही व्यापक संज्ञा आहे. तिची व्याप्ती वाढत आहे. कालपर्यंत ज्याची कल्पना केली जात नव्हती अशा गोष्टी कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. कर्मचाऱ्यांना दिले जाणारे अनुषंगिक लाभ हे बऱ्याच प्रमाणात परिस्थितीजन्य असतात. व्यवसाय, संघटना, समाज व देशातील कार्यसंस्कृती व आर्थिक स्थिती यांचे कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या अनुषंगिक लाभांमध्ये प्रतिबिंब दिसून येते. या लाभाचे कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर निश्चितपणे दीर्घकालीन परिणाम होतात. अनुषंगिक लाभ योजनेचे यश अनेक बाबींवर अवलंबून असले तरी ते प्रामुख्याने प्रशासनामार्फत त्याची कशी अंमलबजावणी केली जाते आणि कर्मचारी त्यांना कशा प्रकारे प्रतिसाद देतात त्यावर अवलंबून असते.

सध्या अनुषंगिक लाभ देणे ही औद्योगिक जगामध्ये एक सामान्य बाब बनली आहे.त्यांची नेमकी यादी करणे अवघड आहे.तथापि, त्यामध्ये प्रामुख्याने गुणात्मक श्रेणीवाढ, गरजेनुरुप प्रशिक्षण, गणवेष, साधन सामग्री, रजा, सवलतीत प्रवास, भोजन, निवास, सानुग्रह अनुदान, इनसेन्टीव्ह, निवृत्ती वेतन, तोषदान, वैद्यकीय सेवा, धुलाई, आरोग्य पूरक आहार भत्ता, प्रोत्साहन, उत्कृष्ट कामाची नोंद, त्यासाठी पुरस्कार, गुणगौरव, प्रबोधन, अधिनियम व संघटनेशी केलेल्या कराराची सुलभ अंमलबजावणी, कर्मचारी व कुटुबियांचे जीवनमान उंचावणे, त्यांना सामाजिक स्थैर्य व सुरक्षा देणे, इ.उद्दिष्टांचा समावेश होतो.

अनुषंगिक लाभांची संकल्पना कर्मचाऱ्यांचे जीवन,कार्य व ते जेथे काम करतात व रहातात तेथील वातावरणाला सर्वस्पर्शी आहे. मालकानी कर्मचाऱ्यांना विविध अनुषंगिक लाभ उपलब्ध करुन दिल्यास त्याचे विविध दिशांनी परिणाम घडून येणे स्वाभाविक आहे. याचे दृश्य परिणाम कधी लगेच तर कधी दीर्घकालाने दिसतात, हे निश्चित आहे. संस्था राहिली तर आपण व आपला सामाजिक दर्जा रहाणार आहे,हे सत्य स्विकारुन संस्थेपेक्षा व्यक्ती मोठी होवू शकत नाही. त्यामुळे संस्था मोठी करा, परिणामी तुम्ही मोठे व्हाल हे निश्चित व निर्विवाद सत्य आहे. याचे भान राखून स्वत:बरोबर मुलत: संस्थेसाठी कार्यरत राहा.

## परिचय अभिनव अधिकारी/सेवकांचा

वैशिष्टयपूर्ण योजना राबविणाऱ्या अधिकारी/सेवकांच्या परिचय मालिकेतील अधिकारी म्हणून या अंकात श्री. रमेश शेलार यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. रमेश शेलार यांनी त्यांच्या करिअरची सुरुवात पुण्यातील एका प्रतिथयश खाजगी विकासकाकडे आरेखक या पदावर केली. काम करत असतानाच त्यांनी डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरिंग ही पदवी प्राप्त केली. नोव्हेंबर, १९९५ मध्ये ते ज्युनिअर इंजिनिअर (सिव्हिल) या पदावर पथ विभागात मनपामध्ये रुजू झाले. त्याच दिवशी त्यांची घोलेरोड क्षेत्रीय कार्यालयाकडे बदली झाली. घोलेरोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत काम करताना सेनापती बापट रस्त्यावरील विश्राम सोसायटी येथे पाणी पुरवठा विस्कळीत झाला होता व या भागात तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त श्री. टी.एन.शेषन भेट देणार होते. श्री. शेलार यांनी अत्यंत त्वरेने कार्यवाही करुन २०० मिटरची लाईन नव्याने टाकली. तत्कालीन अतिरिक्त नगर अभियंता (पाणी पुरवठा) श्री. घोडके यांनी शेलार यांच्याया कार्याची दखल घेवून त्यांचे खास अभिनंदन केले.

सेवेत असताना श्री. शेलार यांनी कार्यालयीन कर्तव्य पार पाडत असतानाच बी.ई. (सिव्हिल), एल.एल.बी., एल.एल.एम.इत्यादी पदव्या प्राप्त केल्या आहेत.

सन १९९७ साली पुणे शहरास पुराचा मोठा फटका बसला. कामगार पुतळा झोपडपट्टीमध्ये नदीपात्रातील एक झोपडीधारक त्याच्या झोपडीत पाणी शिरुनही झोपडी सोडण्यास तयार होत नव्हता. मनपा सेवकांनी त्यास वारंवार विनंती केली. परंतु त्यासही त्याने दाद दिली नाही.श्री. शेलार यांनी पोहत जावून त्या झोपडीधारकास बाहेर काढून त्याचे प्राण वाचवले.

श्री. शेलार यांची नेमणूक ज्युनिअर इंजिनिअर या पदावर झाली असली तरी त्यांनी अतिक्रमण, जनगणना, कर संकलन, क्षेत्रीय कार्यालय या ठिकाणी यशस्वीपणे कार्यभार सांभाळला आहे. सन १९९९ मध्ये कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मा. अरुण पाटील, तत्कालीन क्षेत्रीय आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या अतिक्रमण विरोधी कारवाईत १७ अरुंद रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात श्री. शेलार यांनी धडाडीने भाग घेतला. त्यांच्या या कामाची नोंद घेवून त्यांना जनगणना विभागाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. जनगणना कामी पुणे शहरातील सर्व शिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. त्याविरुध्द सर्व शिक्षकांनी बालगंधर्व रंगमंदीर येथे निदर्शने केली. श्री. शेलार यांच्या कुशल हाताळणीने सदर निदर्शकांच्या मागण्यांबाबत विचार होवून अंतिमत: सर्व शिक्षकांचा जनगणनेच्या कामी सहयोग लाभला.



बांधकाम विभागाकडे काम करत असताना पुणे मनपाकडे

**संवादक : अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी**

नव्याने समाविष्ट झालेल्या हद्दीतील १-२ गुंठा व त्यापुढील मिळकतींच्या मोजणी दाखला नियमितीकरणा मध्ये श्री. शेलार यांनी पुढाकार घेतला होता. याचा परिणाम म्हणून लहान-मोठ्या सर्व मिळकतींचे नियमितीकरण वेगाने पूर्ण करणे शक्य झाले. कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तत्कालीन क्षेत्रीय अधिकारी श्री. उमेश माळी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या मिळकतकर वसुली मोहिमेमध्ये श्री. शेलार यांनी पुढाकार घेवून एक महिन्याच्या कालावधीत तीन कोटी रुपये वसुल केले.

तत्कालीन क्षेत्रीय अधिकारी श्री. ढमढेरे यांचे रजेच्या मुदतीत क्षेत्रीय अधिकारी, टिळकरोड क्षेत्रीय कार्यालय यांचा कार्यभार प्रथमत: सात महिने, नंतर चार महिने, नंतर पाच महिने अशा पध्दतीने जवळपास तीन वर्षे अत्यंत यशस्वीपणे सांभाळला. त्यांच्या कामाचा उरक व झपाटा पाहून तत्कालीन उप आयुक्त श्री. ज्ञानेश्वर ढुबे यांनी श्री. शेलार यांची सहाय्यक निवडणूक अधिकारी या पदावर नेमणुकीची शिफारस केली. या पदावरही श्री. शेलार यांनी अत्यंत कुशलतेने व धडाडीने काम पाहिले.

याचा परिणाम म्हणून अतिक्रमण विभागाकडे विशेष कार्याधिकारी म्हणून श्री. शेलार यांची नियुक्ती झाली. अतिक्रमण विभागातही त्यांनी अत्यंत धडाडीने अतिक्रमणविरोधी कारवाया केल्या. यामध्ये प्रामुख्याने पुणे-नगर रस्ता, पुणे-आळंदी रस्ता, धानोरी-विश्रांतवाडी रस्ता, धानोरी-विमानतळ रस्ता, सिंहगड रस्ता, बाणेर रस्ता, सोलापूर रस्ता, नेहरु रस्ता, सातारा रस्ता, विद्यापीठ रस्ता, इत्यादी ठिकाणी १५-२० वर्षे रखडलेल्या अतिक्रमणविरोधी कारवाया पूर्ण केल्या. हे करत असताना त्यांना प्रसंगी राजकीय, धार्मिक वा सामाजिक स्तरावर प्रखर विरोध सहन करावा लागलेला आहे. त्यांच्या कार्याची दाखल घेवून पुणे महानगरपालिका अभियंता संघातर्फे त्यांना गुणवंत अभियंता हा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

कर आकारणी व कर संकलन विभागात काम करत असताना त्यांनी कर आकारणी न झालेल्या १५० ते १७५ मिळकतींची कर आकारणी करुन कर वसुल करण्यात महत्वपूर्ण वाटा उचलला आहे. ते विधी पदवीधर असल्याने विविध कायद्यातील तरतुदींची त्यांना उत्तम समज आहे. पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या टॅक्स अदालतमध्ये ते महत्वपूर्ण भूमिका बजावतात.

श्री. शेलार यांच्या कामाची प्रशासनाचे वेळोवेळी दखल घेतली असून, मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांना तीन वेळा अर्धशासकीय पत्र देवून अभिनंदन केले आहे. अशा प्रकारचे अभिनंदनास पात्र ठरणाऱ्या अत्यंत थोडक्या अधिकाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होतो.

सामाजिक बांधिलकी जाणीव ठेवून समाजबांधवांसाठी कार्य करण्याचा त्यांचा मानस असून, गोरगरीब व अडलेल्या नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला देण्याचे केंद्र घोडनदी येथे स्थापन करण्याचा मानस असल्याचे त्यांनी ठाम प्रतिपादन केले.

# माहे मे सेवापूर्ती समारंभ

माहे मे, २००८ मध्ये सेवानिवृत्त झालेल्य ९२ सेवकांसाठी दिनांक ३१/५/२००८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. या ९२ सेवकांपैकी वयोपरत्वे ७५ तर १६ ऐच्छिक सेवानिवृत्त सेवकांचा समावेश आहे. या सेवापूर्ती समारंभास मा. कमलताई ढोलेपाटील, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तसेच, मा. शरद समेळ, नगरसचिव, पीएमसी एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष व सरचिटणीस अनुक्रमे श्री.तुकाराम जगताप व श्री. पांडुरंग सावंत, पुणे मनपा युनियनचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाश जाधव या मान्यवरांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी केले. प्रास्ताविकामध्ये उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली.



पुणे महापालिकेने विकास कामामध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणेसाठी प्रयत्नशील आहे. त्या अनुषंगाने आपल्या प्रदीर्घ सेवेमधील अनुभवाची शिदोरी घेवून आपण सेवानिवृत्त होत आहात. आपल्या या अनुभवाचा विकास कामांमध्ये सहभाग वाढविण्यासाठी आपण सर्वांनी त्या दृष्टीने प्रयत्नशील राहण्याबाबत श्री. जगताप यांनी सेवानिवृत्तांना आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात आमदार मा. सौ. कमलताई ढोले पाटील यांनी सेवानिवृत्त सेवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, माणूस हा कधीच सेवानिवृत्त होत नाही. तुम्हीही स्वत:ला सेवानिवृत्त समजू नये. सेवाकाळात आलेल्या अनुभवांवर उर्वरित आयुष्याची वाटचाल करणे आवश्यक आहे. तसेच, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी मिळालेला वेळ व मिळालेली रक्कम यांचा सदुपयोग कसा करावा याबाबतही मार्गदर्शन केले. मा. सौ. कमलताई ढोलेपाटील जेंव्हा या सभागृहाच्या सभासद होत्या तेंव्हा त्यांना सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचा सत्कार शिवाजी सभागृहात व्हावा असे प्रकर्षाने वाटायचे व तो योग सल्लागार (कामगार) कार्यालयाच्या प्रयत्नाने आला आहे, याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

समारंभात मा. शरद समेळ, नगर सचिव यांनीही सेवकांना मार्गदर्शन केले. सेवानिवृत्त सेवकांना मान्यवरांच्या हस्ते शॉल व स्मृतिचिन्ह देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शिवाजी दौंडकर, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. जयवंत शिंदे यांनी केले. या सेवापूर्ती समारंभाचे प्रमुख उद्देश सेवानिवृत्त सेवकांना त्यांच्या देय रकमा विहित मुदतीत आदा करणे आहे. त्या अनुषंगाने या समारंभास ४६ सेवकांच्या अनुज्ञेय रकमा आदा करण्यात आल्या आणि १८ सेवकांची पेन्शन प्रकरणे अंतिम करण्यात येवून त्यांना पी.पी.ओ.क्रमांकही देण्यात आले. या सर्व पगारपत्रक लेखनिकांचे आभार मानून, कार्यक्रम संपन्न झाला.

# लोअर व हायर डिपार्टमेंटल परीक्षा प्रशिक्षण समारोप

सन २००८ वर्षामध्ये प्रशासनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या लोअर व हायर डिपार्टमेंटल परीक्षेसाठी अनुक्रमे १३२ व २१६ कर्मचारी परीक्षार्थी होते. या कर्मचाऱ्यांसाठी पी.एम.सी. एम्प्लॉईज युनियनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा समारोप कार्यक्रम दिनांक २८/५/२००८ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. पी.बी.जोशी, विभागीय संचालक, केंद्रीय कामगार शिक्षण केंद्र, पुणे व मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये श्री. चंद्रकांत शितोळे, श्री. अरविंद नवले, श्री. पांडुरंग सावंत व श्री. शिवाजी दौंडकर यांनी वेगवेगळ्या विषयांवर परीक्षार्थींना मार्गदर्शन केले.



कार्यक्रमामध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना मा. नंदकिशोर जगताप यांनी लोअर व हायर या परीक्षांचा अभ्यासक्रम बदलण्याची गरज प्रतिपादन केली. दैनंदिन कामकाजात संगणकाचा वाढत असलेला वापर, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात वेगाने होणारी प्रगती या अनुषंगाने गरजेनुरुप प्रशिक्षण आणि अभ्यासक्रम असणे ही काळाची गरज आहे असे मा. जगताप यांनी स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे मा. श्री. पी.बी.जोशी यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये मार्गदर्शन करणारे शिक्षक आणि युनियनचे विशेष आभार मानले. याशिवाय महापालिका ही आपली संस्था आहे, संस्थेमुळे सर्व कर्मचाऱ्यांना सामाजिक दर्जा आणि सुरक्षितता प्राप्त झाली आहे, या बाबी विचारात घेवून केवळ परीक्षेपुरता अभ्यास व ज्ञान मर्यादित न ठेवता त्याचा वापर दैनंदिन कामकाजामध्ये करणे आवश्यक असल्याचे मत श्री.जोशी यांनी व्यक्त केले.

या प्रशिक्षण वर्गाबाबत सर्वश्री माधव कोलगावकर, देवीदास चव्हाण आणि श्रीमती परदेशी यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या मनोगतामध्ये या ठिकाणी जे ज्ञान मिळाले ते संपूर्ण सेवाकालावधीसाठी उपयुक्त असून, त्याचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग झाल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पी.एम.सी. एम्प्लॉईज यांनी केले व आभार प्रदर्शन श्री. दिपक एकबोटे यांनी केले.

# माहे जून सेवापूर्ती समारंभ

माहे जून २००८ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या एकूण ४२ सेवकांचा सेवापूर्ती समारंभ कै. वडके



हॉल येथे दिनांक ३०/६/२००८ रोजी संपन्न झाला. सर्व सेवानिवृत्त सेवकांना स्मृतीचिन्ह व शॉल देवून सन्मानित करण्यात आले. समारंभास मा. डॉ. सिध्दार्थ धेंडे व मा. विकास मठकरी, विरोधी पक्ष नेता, पुणे मनपा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुरुवातीस सेवानिवृत्त सेवकांना श्री. तांबे, गुंतवणूक सल्लागार यांनी निवृत्तीनंतर करावयाच्या गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन केले.

सेवानिवृत्त सेवकांना मार्गदर्शन करताना मा. विकास मठकरी यांनी सांगितले की, सेवापूर्ती समारंभ हा मनपा सेवक व मनपा यांच्या जीवनातील महत्वाचा दिवस आहे. त्यामुळे मनपातील सर्वोच्च अधिकारी व सर्वोच्च पदाधिकारी यापैकी एकाने अथवा दोहोंनी या समारंभास उपस्थित राहून सेवानिवृत्त सेवकांना सन्मानित करणे आवश्यक आहे. सेवानिवृत्त झालो म्हणजे जीवनातून निवृत्त झालो असे समजू नये. वय वर्षे ५८ अथवा ६० हे वृध्दत्वाचे वय नसून केवळ जीवनाचा एक टप्पा बदलण्याचे वय आहे. जीवनात मिळालेल्या अनुभवाचा वापर करुन स्वत: व समाज कसा आनंदी होईल हे सेवानिवृत्त सेवकाने पहावे. सेवेत असताना आपण जे काम करतो ते मोबदल्यात करतो. पण ज्या संस्थेने आपणास मिठभाकर दिली, त्या संस्थेस आपण देणे लागतो. मनपाच्या प्रत्येक कार्यवाहीमध्ये निवृत्त सेवक निरनिराळ्या मार्गाने योगदान देवू शकतात. मनपाचे नाव उज्वल होईल याबाबत आपण दक्ष राहिले पाहिजे. किमानपक्षी मनपाबद्दल वर्तमानपत्रात प्रसिध्द होणाऱ्या भडक बातम्यातील माहितीवर आधारित वाईट बोलणे टाळणे आवश्यक आहे.

मा. डॉ.सिध्दार्थ धेंडे यांनी मार्गदर्शनपर भाषणात या उपक्रमाची प्रशंसा केली व ते पुढे म्हणाले की, सेवानिवृत्ती म्हणजे रंगमंचावरील एका भूमिकेतून दुसऱ्या भूमिकेत जाणे किंवा एखादी मुलगी माहेरहून लग्नानंतर सासरी जाते. त्याप्रमाणे सेवानिवृत्ती ही एक हंगामी अवस्था आहे. मनाने चिरतरुण राहिल्यास म्हातारणपण येत नाही. आपण अखंडपणे कार्यात गुंतवून घेतले पाहिजे. जी माणसे कामामध्ये झोकून देतात त्यांना आजार होत नाहीत. त्यांनी राजकारणातील अनेक जेष्ठ नेत्यांचे दाखले दिले. वयाच्या ८०-८५ व्या वर्षीही अनेक राजकारणी शरीराने व मनाने ठणठणीत आहेत. याचे रहस्य ते अखंडपणे करत असलेल्या कामामध्ये आहे. आपण आपल्या आरोग्याची काळजी घेतली तरच उर्वरित आयुष्याचा उपभोग घेता येणे शक्य आहे.

श्री. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पी.एम.सी.एम्प्लॉईज युनियन व श्री. नवले, सेवानिवृत्त संघ यांनीही प्रसंगी सेवानिवृत्त सेवकांना मार्गदर्शन केले. सत्कारास उत्तर श्री. दीपक कुलकर्णी यांनी दिले. उर्वरित आयुष्यातील दररोज एक तास समाजकार्यासाठी देणे आवश्यक असल्याचे श्री. कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले.

समारंभात चालू महिन्यातील सर्व पेन्शन प्रकरणे त्वरेने निकाली काढण्याबद्दल मा. अंबरिश गालिंदे, मुख्यलेखापरीक्षक यांचे खास आभार मानण्यात आले.

समारंभाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन श्री.अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी यांनी तर सूत्रसंचालन श्री.जयवंत शिंदे यांनी केले.

# गुणवंतांचा सत्कार

कामगार कल्याण निधीतर्फे सभासद सेवकांच्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षांमध्ये ७५% किंवा त्यापेक्षा जादा गुण प्राप्त केलेल्या गुणवंत पाल्यांचा सत्कार माहे जुलै २००८ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. सबब, निधीच्या सर्व सभासद सेवकांनी सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे दिनांक १०/७/२००८ पर्यंत साक्षांकित गुणपत्रिकेसह मा. खातेप्रमुखांच्या मार्फत अर्ज करावा किंवा आवश्यक वाटल्यास जादा माहितीसाठी संपर्क साधावा.

# सफाई कर्मचाऱ्यांसाठी व्यसनमुक्ती



महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची सद्यस्थिती आणि त्यावर उपाययोजना सुचविणेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारशींमध्ये सफाई कर्मचाऱ्यांसाठी व्यसनमुक्ती बाबत प्रबोधनपर शिबीरे आयोजित करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यानुसार दिनांक २९/५/२००८ रोजी हुतात्मा बाबू गेनू शाळा येथे आणि दिनांक ४/६/२००८ रोजी संत नामदेव विद्यालय येथे व्यसनमुक्ती क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत असलेल्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रामार्फत शिबीरे आयोजित करण्यात आली होती. दिनांक २९/५/२००८ रोजीचे शिबीर बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तीन कोठ्यांमधील सफाई कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांची प्रमुख उपस्थिती होती. हे शिबीर आयोजित करण्यात बिबवेवाडी आरोग्य मंदीराचे मोकादम श्री. तुकाराम कदम व बिगारी सेवक श्री. रमेश जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

दिनांक ४/६/२००८ रोजीचे प्रशिक्षण सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयातील सफाई कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. या शिबीरास मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), मा. सुनिल केसरी, क्षेत्रीय अधिकारी, सहकारनगर व मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन हे उपस्थित होते. या शिबीरांदरम्यान कर्मचाऱ्यांचे प्रबोधन आणि जनजागृती करणेकामी प्रशिक्षकांनी व्यसन, प्रकार आणि त्यांचे दुष्परिणाम या अनुषंगाने मनोरंजनात्मक शैलीमध्ये व्याख्यान दिले. या शिबीराच्या यशस्वी आयोजनामध्ये आरोग्य निरीक्षक श्री. श्रीश्रीमाळ व बिगारी सेवक श्री. रमेश जाधव यांनी योगदान दिले. वरील दोन्ही शिबीरे आयोजित करण्यामध्ये मा. अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. अशा प्रकारची प्रबोधनपर शिबीरे विविध क्षेत्रीय कार्यालयामध्ये राबविण्याचा सल्लागार (कामगार) कार्यालयाचा मनोदय आहे.

# गर्भलिंग निदान विरोधी जनजागरण मोहिम

सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रीतील वार्ड क्र. १२५ मधील नागरिकांसाठी क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने दिनांक २४/५/२००८ रोजी जनजागरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांतर्गत स्त्री भृण हत्या विरोधी व महिला सबलीकरण या विषयांना स्पर्श करणारी सोंगटी ही द्विपात्री एकांकिका सादर करण्यात आली. या कार्यक्रमास मा.सौ अश्विनीताई कदम, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, डॉ. राजेश दिघे, सौ. माधवी सोमन, समाजसेवक श्री. नितीन कदम व सुमारे २०० महिला उपस्थित होत्या. यामध्ये कष्टकरी महिला, समाजसेविका, अंगणवाडी सेविका व सोसायटयांमधील शिक्षित महिलांचाही समावेश होता. या जनजागरण मोहिमेमध्ये डॉ. दिघे यांनी



पी.एन.डी.टी. अधिनियमातील तरतुदी आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांची थोडक्यात माहिती दिली. तसेच, मा. अश्विनीताई कदम यांनी भारतातील दरहजार पुरुषांमागे घटत चाललेले स्त्रियांचे प्रमाण व त्यामुळे उद्भवणारे सामाजिक प्रश्न यांचा उहापोह केला. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यामध्ये मा. सुनिल केसरी, क्षेत्रीय अधिकारी, सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय व त्यांच्या सहकाऱ्यांचा वाटा आहे.


**कल्याणवार्ता**
**जून, २००८**
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रविणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖
श्री.शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)


# घर

घर हे मानवस्पर्शी अवकाशाचे एक रेखीव रुप. माणसाने पृथ्वीवर घर बांधले व तो घरात राहू लागला. तेंव्हापासून हे रहाते घर मानवी मनात घर करुन राहू लागले आणि त्याच क्षणी या घराचे आणि मनाचे अगदी पहिले नाते जुळले आणि युगायुगातून ते वाढत राहिले.

मानवाने आपल्या देहाच्या रक्षणासाठी मातीचे घर बांधले आणि आपल्या आत्म्याच्या निवासासाठी स्वत:च्या देहाचेच घर उभारले आणि या देहमंदिरातच मानवी आत्म्याला पहिला निवारा मिळाला. तेंव्हापासून मानवी आत्मा माणसाला आधार देत आला आहे. या अनंत अवकाशाच्या पोकळीत घरानेच माणसाला आधार दिला. घराप्रमाणेच आत्मा हा माणसाला दुसरा आधार लाभला. घराशिवाय आणि आत्म्याशिवाय माणूस निराधार, परात्म, पोरका होईल, एकाकी पडेल म्हणूनच माणसाला जशी घराची एक मुलभूत ओढ असते तशीच त्याला आपल्या आत्म्याची स्वत:चीही मुलभूत ओढ असते. घर हे मानवाला आतून व बाहेरुन ओढीत व तेढीत असते. म्हणूनच मानवाच्या भावसृष्टीत व प्रतीकसृष्टीत मनाला व आत्म्याला साकार करणाऱ्या घराच्या आदिबंधरुप प्रतिमांना महत्वाचे स्थान आहे.

अशोक कांबळे, बिगारी,
उप आयुक्त (गवनि) कार्यालय

# आवाहन

सल्लागार (कामगार) कार्यालयामार्फत कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ७१ व ७२ दिनांक १/७/२००८ पासून कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय, दुसरा मजला या ठिकाणी सुरु झाला आहे. तरी, कामगार प्रशिक्षण वर्गासाठी निवड झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थींनी याची नोंद घेवून वर्गास वेळेवर उपस्थित रहावे. प्रशिक्षण वर्गात शिकविण्यात येणाऱ्या विषयांचा पूर्ण अभ्यास करावा. संपूर्ण प्रशिक्षण कालावधीत तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास वा उशिरा आल्यास पटावरील नाव कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. प्रशिक्षण वर्गादरम्यान विविध कारखाने, औद्योगिक व सार्वजनिक क्षेत्रातील मान्यवर संस्थोना तुम्ही मनपाचे प्रतिनिधी म्हणून भेट देणार आहात, त्या ठिकाणी आपल्या वर्तनाने आदर्श निर्माण करावा व प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करावे.

# जन माहिती अधिकाऱ्यांसाठी

१. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ नुसार महापालिकेच्या संकेत स्थळावर व कार्यालयाच्या दर्शनी भागात १ ते १७ बाबींच्या अनुषंगाने प्रसिध्द केलेली माहिती वेळीच अद्ययावत करावी.

२. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेले अर्ज आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विवरणपत्र क्र. १ ते ३ मध्ये दरमहा ५ तारखेपर्यंत सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे पाठवावा.

३. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जास ३० दिवसाचे आत आहे त्या नमुन्यात माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

४. उपलब्ध माहिती सत्वर द्यावी. अंतिम मुदतीची (३० दिवसांची) प्रतिक्षा करु नये.

५. माहिती इतर विभागांशी संबंधित असल्यास सदर अर्ज त्या विभागाकडे पाठवून त्याप्रमाणे अर्जदारासही पाच दिवसांत कळवावे.

## वाचकांसाठी...

❖ खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलबध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
❖ आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
❖ **अंकासाठी आपले लेख, कविता, साहित्य तसेच अभिप्राय व सूचना सल्लागार (कामगार) कार्यालयास द्या.**
❖ अभिनव उपक्रम/योजना/कार्यक्रम, विशेष कामगिरीची माहिती, इ. चे फोटोसहित संक्षिप्त वृत्त वा टिपण तयार करुन पाठवा.
❖ मनपा वेबसाईटवर प्रसिध्द केलेला अंक पहा